# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील व महानगरातील सर्व दुकाने तसेच केंद्र, राज्य व खाजगी आस्थापनांत महाराष्ट्र दुकाने व आस्थापना सुधारित अधिनियम, २०२२ ची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१) १३६४२ (२८-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना सुधारित अधिनियम, २०२२ मधील कलम ३६ क (१) व (२) नुसार सर्व दुकाने व आस्थापनांचे फलक मराठी भाषेमध्ये लिहिणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात बहुतांश दुकाने व आस्थापनांनी उक्त अधिनियमाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अधिनियमाची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आणि राज्यातील व महानगरातील सर्व दुकाने तसेच केंद्र, राज्य व खाजगी आस्थापनांत उक्त अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील सर्व आस्थापनांचे नामफलक मराठी देवनागरी लिपित तसेच सुरुवातीस दर्शविण्याबाबत तसेच मराठी अक्षराचा टंकआकार इतर भाषेतील टंकआकारापेक्षा लहान असणार नाही अशी सुधारणा महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन)(सुधारणा) अधिनियम, २०२२ अन्वये दिनांक १७/०३/२०२२ रोजी करण्यात आली आहे.

(२) व (३) उपरोक्त तरतुदींची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून कामगार आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयामार्फत राज्यातील विविध ठिकाणच्या १९८१६ दुकाने व आस्थापनांना भेटी दिलेल्या असून, त्यांना नोटीसा बजावल्या आहेत. त्यामध्ये अद्यापपर्यंत ४७२३ आस्थापनांनी अंमलबजावणी केली असल्याचे आढळून आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेसारख्या क्षेत्रात उक्त तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता महानगरपालिका स्तरावरुन विविध व्यापारी संघटना प्रतिनिधी व मालकांसोबत बैठका घेण्यात आल्या आहेत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयांमध्ये तसेच गर्दीच्या ठिकाणी फलक लावून, वर्तमानपत्राव्दारे व रेडीओच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

नोटीसा देऊनही अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित आस्थापनेविरुध्द महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ च्या कलम २९ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इंदापूर (जि.पुणे) परिसरात बेकायदा गर्भलिंग निदान केंद्र चालविण्यात येत असल्याबाबत

**(२) १३६५५ (०७-०७-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) परिसरात एका वाहनात बेकायदा गर्भलिंग निदान केंद्र चालविण्यात येत असल्याची बाब दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर गर्भलिंग निदान प्रतिबंध कायद्यान्वये कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०८-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

मौजे सराटी, तालुका इंदापुर, जिल्हा पुणे या गावाच्या हद्दीत गाडीमध्ये काही लोक बेकायदेशीरपणे गर्भलिंग परिक्षण करीत असल्याची माहिती दिनांक १३ मे, २०२२ रोजी तालुका समुचित प्राधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय इंदापुर यांना मिळाली. त्यानुसार तालुका समुचित प्राधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय इंदापुर यांनी गठित केलेल्या चमुने सदर बाबीची खात्री करण्यासाठी घटनास्थळी भेट दिली असता, बलेनो गाडी (एमएच ११ सीजी ८०१६) या वाहनात गर्भलिंग परिक्षण करीत असल्याचे सदर चमूच्या निदर्शनास आले आहे.

त्यानुसार गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ सुधारित २००३, मधील कलम २३, २५ व २९ अन्वये लॅब टेक्निशियन, डॉक्टर व वाहनचालक यांचेविरुध्द प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी इंदापूर, जि.पुणे यांच्या न्यायालयात सी.सी.क्र.२९१/२०२२ अन्वये खटला दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाचे ऑनलाईन पोर्टल बंद असल्याने जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या बदल्या प्रलंबित असल्याबाबत

**(३) १३६८६ (२८-०६-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ७५१६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांसाठी तयार करण्यात आलेले सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक त्रुटी आढळल्याने ग्रामविकास विभागातील हजारो शिक्षकांच्या बदल्या ३ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाइन सॉफ्टवेअरची तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी शासन दिरंगाई करत असून १ हजार शिक्षकांची प्राथमिक माहिती घेण्याची तयारीही पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत/ आंतरजिल्हा बदल्यांसंदर्भात धोरण निश्चित करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास दिनांक १८ मार्च, २०२० रोजी सादर केला असून शिक्षकांच्या विविध संघटनांनी सुचविण्यात आलेल्या सुधारणांवर अभ्यासगटाबरोबर विचार-विनियम करुन अभ्यासगटाने सुचविलेल्या सुधारणांनुसार अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयामध्ये आवश्यक ते बदल करुन शासन निर्णय निर्गमीत केला आहे काय व केव्हा,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने ऑनलाइन प्रणाली सुसज्ज करुन पारदर्शक पध्दतीने बदल्या पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१६-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) ग्रामविकास विभागाच्या दिनांक २७/०२/२०१७ आणि दिनांक २४/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या अनुक्रमे जिल्हांतर्गत आणि आंतरजिल्हा बदल्यांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. सदर धोरणात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयानुसार कार्यान्वित केलेल्या संगणकीय बदली प्रक्रीयेचा अभ्यास करुन त्यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे काय अथवा सुधारित धोरण निश्चित करणे गरजेचे आहे काय, याबाबत अभ्यास करुन त्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०४/०२/२०२० अन्वये श्री.आयुष प्रसाद, भाप्रसे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट स्थापन करण्यात आला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, जिल्हा परिषद शाळांमधील घटणारी पटसंख्या, अध्यापनातील स्थैर्य, शिक्षकांना काम करीत असताना उद्भवणाऱ्या अडी-अडचणी विचारात घेऊन जिल्हा परिषद शिक्षकांचे नव्याने बदली धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत / आंतरजिल्हा बदल्यांसाठी संदर्भीय दिनांक ०७/०४/२०२१ च्या दोन स्वतंत्र शासन निर्णयान्वये सुधारित धोरण विहित करण्यात आले आहे.

सदर धोरणातील तरतूदीनुसार जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत/ आंतरजिल्हा बदल्यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. तसेच, सन २०२२ मधील बदल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येणार असून, सदर प्रणालीद्वारे बदल्या करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## परभणी जिल्ह्यातील टाकळी (कु.) ते शहापूर दरम्यानच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४) १३८३३ (२८-०६-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १२०९५ ला दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी (कु.) ते शहापूर (ता.जि.परभणी) दरम्यानच्या गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम सहा महिन्यापूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तयार करण्यात आले असून निकृष्ट दर्जाच्या कामामुळे त्या रस्त्याची दुरवस्था झाली असून संबंधित कंत्राटदार व सनियंत्रण अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी ई-मेलद्वारे प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या कामाची वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचेमार्फत आदेशित केलेली तपासणी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे निकृष्ट पध्दतीने काम करणाऱ्या कंत्राटदार व सनियंत्रण अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०८-२०२२) :** (१) तक्रार प्राप्त झाली, हे खरे आहे.

(२) व (३) वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचे अहवालानुसार, जड वाहतुकीमुळे व पाण्याचा निचरा न झाल्यामुळे रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच पाचपैकी एक ठिकाणी डांबर कामाची जाडी ३ मि.मी. ने कमी आढळून आली. तथापि, सदर काम अद्याप प्रगतीपथावर असल्याने आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता क्षेत्रिय स्तरावरून करून घेण्याबाबत राज्य गुणवत्ता समन्वयक स्तरावरून सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

---

## वेरुळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे असलेल्या श्रीक्षेत्र घृष्णेश्वर मंदीराच्या विकास कामाबाबत

**(५) १३८६९ (२८-०६-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेरुळ (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील श्रीक्षेत्र घृष्णेश्वर मंदीराच्या विकास कामासाठी माहे मार्च, २०१८ मध्ये रुपये ११२ कोटी ४१ लक्षच्या विकास आराखड्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आराखडा शिखर समितीच्या मान्यतेने नियोजन विभागामार्फत राबविण्यात येत असून त्याचे सनियंत्रण अधिकारी हे जिल्हाधिकारी, औरंगाबाद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकास आराखड्यात सुंदर वास्तूशिल्प असलेले प्रवेशद्वार, ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहीती देणाऱ्या संरक्षण भिंतीसह विविध कामांचा समावेश असून आराखडा अंतर्गत मंजूर करण्यात आलेली सर्व कामे पूर्ण करणेसाठी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आराखड्यानूसार सर्व कामे मुदतीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०८-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे, "श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद विकास आराखडा" अंतर्गत मंजूर करण्यात आलेली सर्व कामे पूर्ण करण्याकरीता नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. तीक्षेवि-२०२२/प्र.क्र.८/का.१४४४, दिनांक २१ मार्च, २०२२ नूसार दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीक्षेवि-२०१८/ प्र.क्र.६३/ का.१४४४, दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ अन्वये एकूण रुपये ११२.४१ कोटी किंमतीच्या "श्रीक्षेत्र घृष्णेश्वर, वेरुळ, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद विकास आराखडा" यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये एकूण ६९ कामांचा समावेश असून, यामध्ये (१) सुंदर वास्तूशिल्प असे प्रवेशव्दारे (२) ऐतिहासिक पार्श्वभूमी असे कंपाऊंड वॉल/भिंत (३) स्मार्ट कार्ड, माहिती पुस्तिका इत्यादी कामांचा देखील समावेश आहे. सदर कामांकरीता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम) औरंगाबाद तसेच प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, औरंगाबाद या कार्यान्वयीन यंत्रणा विहित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथील ग्रामीण रुग्णालय ५० खाटांचे करुन तेथे ट्रामा केअर सेंटरला मान्यता देण्याबाबत

**(६) १३८७० (२८-०६-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.औरंगाबाद) तालूका हा धार्मिक तसेच पर्यटन स्थळाच्यादृष्टीने प्रसिध्द असून तेथे हजारो पर्यटक व भाविक येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खुलताबाद येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात मंजूर पदांपैकी ४० टक्के पदे उपलब्ध असून वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माता, दंत सहाय्यक, परिचारीका, लिपिक व शिपाई ही पदे रिक्त असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळत नसून वैद्यकीय सोई-सुविधांचा अभाव असल्याने ग्रामीण रुग्णालयातून रुग्णांना अन्य रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर ग्रामीण रुग्णालय ५० खाटांचे करुन तेथील रिक्त पदे भरुन वैद्यकीय सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच खुलताबाद येथे ट्रामा केअर सेंटर मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१), (२) व (३) ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथे एकूण २९ मंजूर पदांपैकी २० पदे भरलेली आहेत. तेथील वैद्यकीय अधीक्षक संवर्गाचे पद भरलेले असून वैद्यकीय अधिकारी संवर्गाची मंजूर असलेली तीनही पदे भरलेली आहेत. तसेच वर्ग ४ ची रिक्त पदे जाहिरातीद्वारे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. भरलेल्या पदांवरील अधिकारी /कर्मचारी यांचे मार्फत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना वैद्यकीय सोई -सुविधा पुरविण्यात येतात.

ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथील प्रस्तावित ट्रामा केअर युनिट हे शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०१८/ प्र.क्र.१९०/ आरोग्य-३, दिनांक १८/०९/२०२० अन्वये निश्चित केलेल्या अटींची पूर्तता करत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील विविध पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(७) १३८७३ (२८-०६-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.राजहंस सिंह, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.जयंत पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदांमधील १३ हजार ५२१ विविध पदांच्या भरतीची जाहीरात दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी काढण्यात आली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भरती प्रक्रियेत कनिष्ठ अभियंता, ग्रामसेवक, औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक व आरोग्य सेविकांसह विविध पदांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भरतीसाठी राज्यातील सुमारे १३ लाख सुशिक्षीत बेरोजगार युवकांकडून परीक्षा शुल्क म्हणून खुल्या प्रवर्गाच्या एका पदासाठी रुपये ५०० तर आरक्षित वर्गासाठी रूपये २५० एवढे परीक्षा शुल्क आकारले जाऊन गोळा केलेली रुपये २५ कोटी ८७ लाख शासनाकडे जमा आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदभरतीची प्रक्रिया सुरु होत नसल्यामुळे सुशिक्षीत बेरोजगार युवकांमध्ये शासनाविरुध्द रोष निर्माण होत असून जाहीरातीला चार वर्षे होवूनही अद्याप रिक्त पदांची भरती न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील जिल्हा परिषदांमधील भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१६-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४), (५) व (६) लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता तसेच त्यानंतर महापोर्टल रद्द झाल्याने सदरची पदभरती होऊ शकली नाही.

त्यानंतर कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले होते.

तथापि, जिल्हा परिषद अंतर्गत भरण्यात येणारी सर्व रिक्त पदे जिल्हा परिषद स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड मंडळामार्फत भरण्याबाबतचा निर्णय ग्रामविकास विभागाच्या दिनांक १० मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार परीक्षा घेण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

---

## वाळूंज (जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(८) १३८७९ (२८-०६-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळूंज (जि.औरंगाबाद) गावची लोकसंख्या ४५००० व परिसरातील लोकसंख्या १ लाख असून येथे सन २०१८ मध्ये गट नं. ३६१ मधील ३ एकर जागेत रुपये ५ कोटी ५० लाख खर्च करून आरोग्य केंद्राची इमारत बांधली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात अपुरा कर्मचारी वर्ग व औषधांचा तुटवडा व कोणत्याही सोई-सुविधा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, शवविच्छेदन व रक्त परीक्षण प्रयोगशाळा अशा तपासण्याचे प्रयोजन असतानाही बाह्यरुग्ण तपासणी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण भागातील रुग्णांना चांगली वैद्यकीय सुविधा देण्यासाठी मनुष्यबळ व औषधी उपकरणे इत्यादी सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) प्राथमिक आरोग्य केंद्र,वाळुंज येथे दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत. आरोग्य सेविका, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना उसनवारी तत्वावर नियुक्ती देवून त्यांच्यामार्फत रुग्णांना सेवा देण्यात येतात. वाळूंज येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, वाळूंज येथे आंतररुग्ण सेवा, रक्त तपासणी इत्यादी सेवा सुरु आहेत. तसेच शवविच्छेदनगृह कार्यान्वित करण्यात आले आहे. प्रसुती, कुंटुबकल्याण शस्त्रक्रीया अपुऱ्या मनुष्यबळाअभावी सद्य:स्थितीत होत नाहीत.

ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक १०/०५/२०२२ अन्वये आरोग्य विभागातील पदे भरण्यास जिल्हास्तरावर मान्यता देण्यात आली असून त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यासाठी स्वतंत्र संसर्ग रोग रुग्णालय आंधण्याबाबत

**(९) १३८८७ (२८-०६-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे स्वतंत्र संसर्ग रोग रुग्णालय बांधण्याबाबत घाटी अधिष्ठातांनी अभ्यागत समितीकडे दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यामध्ये एकही संसर्ग रोग रुग्णालय नसल्याने महत्वाच्या तपासणीकरीता पुणे येथे जावे लागत असल्यामुळे रुग्णांचे निदान होण्यास वेळ लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पुणे येथील नायडू सांसर्गिक रुग्णालयाप्रमाणे मराठवाड्यासाठी स्वतंत्र संसर्ग रोग रुग्णालय बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२४-०८-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे दिनांक ०७/०५/२०२२ रोजी अभ्यागत समितीची बैठक पार पडली. सदर बैठकीत अधिष्ठाता यांनी नायडू रुग्णालयाच्या धर्तीवर महानगरपालिका येथे संसर्ग रुग्णालय सुरु करणेबाबत विनंती केलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथील संस्थेत व्हायरोलॉजी लॅब अंतर्गत एचआयव्ही, हिपॅटायटीस, लेप्टोस्पायरा, डेंग्यू इ. आजारांच्या तपासण्या उपलब्ध असून इतर विषाणूजन्य आजार तपासणीसाठी नमुने पुणे येथे पाठवावे लागतात.

(३) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी मेल्ट्रॉन हॉस्पीटल चिकलठाणा, औरंगाबाद येथे संसर्गजन्य रोग रुग्णालय स्थापन करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्धेकरीता आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना प्रस्ताव सादर केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे मुलींचे शासकीय निरीक्षणगृह स्थापन करणेबाबत

**(१०) १३९०० (०७-०७-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केवळ अमरावती येथे मुलींचे स्वतंत्र निरीक्षणगृह आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथील मुलांचे शासकीय निरीक्षणगृहाच्या जागेतच मुलींसाठी स्वतंत्र शासकीय निरीक्षणगृहाची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद येथे मुलींसाठी स्वतंत्र निरीक्षणगृह नसल्याने विधी संघर्षग्रस्त मुलींना खाजगी संस्थेच्या बालगृहात ठेवले जात असल्याने तेथे अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणत्याही कारणाने बाल गुन्हेगारीकडे वळलेल्या किंवा तशा स्थितीत सापडलेल्या मुलींना स्वतंत्र निरीक्षणगृह बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही,

सद्य:स्थितीत राज्यामध्ये १५ शासकीय निरिक्षणगृह कार्यान्वित आहेत. सदर १५ शासकीय निरिक्षणगृह १२ जिल्ह्यामध्ये कार्यरत असून यापैकी ०२ मुलींसाठी स्वतंत्र निरिक्षणगृह कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही,

औरंगाबाद येथे मुलींसाठी स्वतंत्र शासकीय निरीक्षणगृह स्थापन करण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही.

(३) हे अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत औरंगाबाद जिल्ह्यामध्ये मुलींसाठी स्वतंत्र निरीक्षणगृह कार्यरत नाही. मात्र विधी संघर्षग्रस्त मुली बाल न्याय मंडळाच्या आदेशान्वये प्राप्त झाल्यास सदर मुलींना बाल न्याय मंडळाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील इतर बालगृहांमध्ये ठेवण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार सदर मुलींना लगतच्या जिल्ह्यातील शासकीय तसेच स्वंयसेवी निरीक्षणगृहामध्ये पुनर्वसनासाठी दाखल करण्यात येते.

(४) विधी संघर्षग्रस्त मुलींसाठी आवश्यकतेनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात आलेली असून यापूर्वी मुलांसाठी कार्यरत असलेल्या बुलढाणा आणि चंद्रपुर येथील मुलांच्या निरीक्षणगृहांना मुलींच्या निरीक्षणगृहामध्ये परावर्तीत करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना थकीत वेतन मिळण्याबाबत

**(११) १३९१६ (२२-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महीला व बालविकास विभागातील एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत नागपुर जिल्हातील १५० वर अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून राज्यात एकूण ५००० कर्मचारी काम करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लहान बालकांना पोषण आहार वाटपासोबत गरोदर, स्तनदा मातांची माहीती व कुपोषण दुर करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असून लहान मुलांना प्राथमिक पूर्व शिक्षण देणे इत्यादी कामे एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत प्रतिकूल परिस्थितीत कुपोषण मुक्तीचे काम करणाऱ्या साडेतीन हजार महिला पर्यवेक्षकांना गत ४ महिन्यांपासून दरमहा वेतन मिळाले नसून अधिकारी व कर्मचारी यांना माहे मार्च, एप्रिल व मे, २०२२ चे वेतन मिळाले नसल्याने कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी व साडेतीन हजार महिला पर्यवेक्षकांना थकीत वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत पर्यवेक्षिका, अधिकारी व कर्मचारी यांचे माहे मे, २०२२ पर्यंतचे वेतन अदा झाले असून त्यापुढील वेतनाबाबत वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ट्रामा केअर सेंटर्सचे धोरण निश्चित करण्याबाबत

**(१२) १३९२१ (२८-०६-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, डॉ.रणजित पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.राजेश राठोड : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ३०४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने महामार्गावरील अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन अशा अपघातग्रस्तांसाठी गोल्डन अवरमधील मदतीसाठी सन २०१३ मध्ये राज्यात १०८ ट्रामा केअर सेंटर्सचा बृहत आराखडा तयार केला असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रामा केअर सेंटर्स पैकी ६३ सेंटरर्स कार्यरत असून ४५ सेंटर्स ही नऊ वर्ष झाली तरी कागदोपत्री मंजूर असून १५ सेंटर्सचे अर्धवट बांधकाम झाले असून ३० सेंटर्सचे आराखडे तयार नसल्याची बाब दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी निदर्शनास आली आहे, तसेच काही सेंटर्सचे आराखडे तयार करण्याच्या स्थितीत असून त्यांच्यासाठी जागा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ट्रामा केअर युनिटची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत केली असून सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालात नमूद केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, ट्रामा केअर सेंटरसाठी दोन अस्थीव्यंगोपचार तज्ज्ञ, दोन बधिरीकरण तज्ज्ञ यासह ३३ पदांना मान्यता देण्याबाबत शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील ट्रामा केअर सेंटर्स सुरु करुन सेंटर्समध्ये आवश्यक असलेल्या पदांना मान्यता देण्याबाबत तसेच समितीने केलेल्या शिफरशींची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने सन १९९७ ते आजपर्यंत १०८ ट्रामा केअर सेंटर मंजूर केले आहे. सन २०१३ च्या बृहत आराखड्यानुसार ४२ नविन ट्राम केअर सेंटर्सना मंजूरी देण्यात आली आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३), (४), (५) व (६) होय.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ट्रामा केअर सेंटरबाबत शासनास शिफारस करण्यासाठी गठीत तांत्रिक समितीचा अहवाल/ शिफारशी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२० स्विकारण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने ट्रामा केअर युनिटचे वर्गीकरण केले असून ट्रामा केअरची दर्जावाढ करण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने आयुक्तालयाने दिनांक २९/१२/२०२१ रोजी

शिफारशी विचारात घेऊन अस्तित्वात असलेल्या ट्रामा केअर यूनिट संबंधित सुधारीत आकृतिबंध शासनास सादर करण्यात आला आहे. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. परंतु सदर प्रस्तावात काही त्रुटी असल्याने त्याबाबत आयुक्तालयाकडून माहिती मागविण्यात आली आहे.

---

## बालनाटयासाठी शासकीय अनुदानाची मागणी प्रलंबित असल्याबाबत

**(१३) १३९३७ (२८-०६-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत तीन वर्षापूर्वी नाटयसंस्थांसोबतच बालरंगभूमी परिषद स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यावसायिक नाटकांप्रमाणे बालनाटयांनाही शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी बालरंगभूमी परिषदेमार्फत गेल्या दोन वर्षापासून करण्यात येत असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान हे सर्व बालनाटयांना न देता केवळ दोन अंकी बालनाटयांनाच द्यावे तसेच नाटकाचा दर्जा ठरविण्यासाठी जाणकारांची समिती नेमावी व या समितीनेच अनुदानाबाबत निर्णय घ्यावा अशी मागणी बालरंगभूमी परिषदेने शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालनाटयांचे मोठ्या शहरासह इतरही ठिकाणी प्रयोग व्हावेत यासाठी व्यावसायिक नाटकांना जसे शासन अनुदान देते तसेच अनुदान बालनाटयांच्या प्रयोगासाठी देणे आवश्यक असतानाही ते न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने बालरंगभूमी परिषदेने शासनाकडे अनुदान मिळण्याबाबत दोन वर्षापूर्वी केलेल्या मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१२-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

व्यावसायिक नाटकांप्रमाणे बालनाटयांनाही शासनाने अनुदान देण्याची मागणी शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) व (५) बालरंगभूमी परिषदेने केलेली मागणी शासनास अप्राप्त असल्याने याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील पुलांची व साकवांची देखभाल, दुरुस्ती व नुतनीकरण करण्याबाबत

**(१४) १३९५४ (२५-०६-२०२२) श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १०८२६ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील गावे, वाड्यांना जोडणारे १७३ पुल व साकवांची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पडसरे (ता.सुधागड, जि.रायगड) गावाजवळील पूलाची दुरवस्था झाली आहे, सदर पुलावरुन पडसरे गावासह लोळगेवाडी, एकलघर व आदिवासी आश्रमशाळेत जाणारे विद्यार्थी व ग्रामस्थ दैनंदिन प्रवास करीत असल्याने वाहतुकीस धोकादायक असलेला सदर पूल कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणारे मार्ग, ग्रामीण मार्गावरील धोकादायक व जीर्णावस्था झालेल्या पूलांच्या व साकवांच्या दुरुस्तीसह पुनर्बांधणीसाठी रुपये ९ कोटींचा निधी आवश्यक असून जिल्हा परिषदेने नियोजन समितीकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करुनही अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पावसाळ्यापूर्वी पुलांची व साकवांची दुरुस्ती न केल्यास पावसाळ्यात वाहतूक सेवा बंद होऊन ग्रामीण भागात आवश्यक सेवा-सुविधा पोहचविताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील पुलांची व साकवांची दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन पुलांची व साकवांची देखभाल, दुरुस्ती, नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१२-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रजिमा-४० ते पडसरे जोडमार्ग (ग्रामा-५) या रस्त्यावरील पुलाच्या पायाची धूप झाली असून एका गाळयाचे डेकस्लॅबचे स्टील दिसत आहे. रेलिंग नसल्याने व पूल धोकादायक झालेने त्यावरुन वाहतूक व्यवस्था बंद करण्यात आली असून तसा नामफलक लावणेत आल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) प्रजिमा-४० ते पडसरे जोडमार्ग (ग्रामा-५) या रस्त्यावरील पुलाचे पुनर्बांधकाम करणेसाठी रुपये ४०.०० लक्ष रकमेचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) लेखाशीर्ष ५०५४-२४१९ (सन २०२२-२३) अंतर्गत जिल्हा नियोजन समितीस जिल्हा परिषदेने सादर केला आहे.

तसेच जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ग्रामीण मार्गावरील धोकादायक पुलांचे पुनर्बांधकाम/साकव दुरुस्ती/नवीन साकव बांधकाम याकरीता रुपये ९१९२.३५ लक्ष रकमेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस जिल्हा परिषदेने सादर केला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील फणसाड धरणातुन पाणी उपलब्ध न झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१५) १३९७० (२८-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील फणसाड परिसरातील बागायतदार शेतकरी हे फणसाड धरणातील पाण्यावर अवलंबून असून दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या सुरूवातीला मिळणारे पाणी अद्यापही न मिळाल्याने अनेक बागायती शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सदर पाणीप्रश्न प्रलंबित राहिल्याची तक्रार तेथील स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या बागायतीचे नुकसान होऊ नये यासाठी फणसाड धरण लघु पाटबंधारे विभागामार्फत पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

गतवर्षी सन २०२१ मध्ये प्रचंड प्रमाणात झालेल्या पावसामुळे फणसाड ल. पा. योजनेच्या कालवा किमी ० ते ०/०२० किमी मध्ये मोठ्या प्रमाणात कालवा भरावामधून गळती झालेली होती. सदर कालव्यांची साफसफाई व गाळ काढणे ही कामे पूर्ण केलेली आहेत. सदर ठिकाणी शेतकऱ्यांच्या पाणी मागणीनुसार सिंचनाकरीता कालव्याव्दारे पाणी दिनांक १२/०२/२०२२ ते १०/०६/२०२२ या कालावधीत पाणी पाळी पत्रकाप्रमाणे कोंकण सिंचन हंगाम सन २०२१-२२ करीता पाणी सोडण्यात आलेले आहे. सिंचन हंगाम सन २०२१-२२ या हंगामामध्ये ७५.१५ हेक्टर सिंचन क्षेत्र लागवडीखाली आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

अशा प्रकारची तक्रार क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव (ता.मुरूड, जि.रायगड) येथील काशिनाथशेठ पांडुरंग कुलकर्णी आरोग्य पथक दवाखान्याला प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा मिळणेबाबत

**(१६) १३९७२ (२८-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (ता.मुरूड, जि.रायगड) येथील काशिनाथशेठ पांडुरंग कुलकर्णी आरोग्य पथक दवाखान्याला साठ वर्षांहून अधिक कालावधी होऊनही अद्यापपर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा प्राप्त न झाल्याने परिसरातील नागरीकांना आरोग्य सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य पथक दवाखान्यात दररोज १०० हून अधिक बाह्यरुग्ण (ओ.पी.डी.) येत असून तेथे एक डॉक्टर, एक मिश्रक, दोन ते तीन परिचारीका व सफाई कामगार असे कर्मचारी काम करीत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुरूड जंजीरा येथील यशवंतनगर पंचक्रोशीतील नांदगाव, मजगाव, उसरोली, वावे, वांद्रे वेळास्ते, विहुर व काशिद ग्रामपंचायत हद्दीतील गोरगरीब जनतेसाठी असलेल्या आरोग्य पथक दवाखान्याला प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१), (२) व (३) मौजे नांदगाव ता.महाड जि.रायगड येथे प्राथमिक आरोग्य पथक व उपकेंद्र या दोन आरोग्य संस्था कार्यान्वित असून या संस्थेमार्फत परिसरातील ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. बोर्लीमांडला प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत नांदगाव प्राथमिक आरोग्य पथक कार्यरत आहे.

प्राथमिक आरोग्य पथक नांदगाव येथे वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी, शिपाई, स्त्री परिचर, सफाई कामगार यांची प्रत्येकी ०१ अशी एकूण ०५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी औषध निर्माण अधिकारी व स्त्री परिचर ही दोन पदे रिक्त आहेत.

सदर संस्था लोकसंख्या व अंतराच्या निकषात बसत नसल्याने नांदगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा परिषद रायगड मार्फत प्रस्तावित करण्यात आले नाही. माजगांव व नांदगाव ही गावे नांदगाव उपकेंद्रांतर्गत येतात. तर उसरोली, वावे, वांद्रे व वेळास्ते गावे वाळवटी उपकेंद्रांतर्गत तसेच विरुर हे आगरदांडा प्राथमिक आरोग्य केद्रांतर्गत असून सदर आरोग्य संस्थांमार्फत परिसरातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येतात, मौजे काशिद येथे उपकेंद्र कार्यान्वित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या नियम बाह्य पध्दतीने झालेल्या बदल्या रद्द करण्याबाबत

**(१७) १३९७९ (२८-०६-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३३५६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत सन २०२० ते सन २०२१ या कालावधीत विभागीय आयुक्त यांचेकडून मंजुरी मिळालेल्या शिक्षक बदली प्रकरणाची चौकशी करून नियमबाह्य बदल्या रद्द करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक १३ जानेवारी, २०२२ व १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी निवेदन पाठवून नियमबाह्य बदल्या रद्द करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नियमबाह्य बदल्या रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१६-०८-२०२२) :** (१) दिनांक १३/०१/२०२२ व दिनांक १२/०२/२०२२ रोजीची निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली नसून विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. तसेच त्यासंदर्भातील दिनांक ०४/०२/२०२२ चे मा.लोकप्रतिनिधी यांचे स्मरणपत्रही विभागीय आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेले आहे व त्या अनुषंगाने वस्तुस्थिती मा.सदस्यांना कळविलेली आहे.
(२) व (३) जिल्हा परिषदेतील गट-क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत दिनांक १५/०५/२०१४ नुसार धोरण निश्चित करण्यात आले होते. तथापि, दिनांक १५/०५/२०१४ च्या शासन निर्णयातून जिल्हा परिषदेतील शिक्षक संवर्ग दिनांक २७/०२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये वगळण्यात आला असून शिक्षक संवर्गाच्या बदल्या ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत दिनांक २७/०२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०२० मध्ये बदल्या करण्यात येऊ नयेत, असे निर्देश वित्त विभागाने दिनांक ०४/०५/२०२० अन्वये दिले. त्यामुळे सन २०२० व २०२१ मध्ये जिल्हा परिषद शिक्षकांची जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया राबविण्यात आली नाही. त्यानंतर दिनांक ०७/०४/२०२१ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत/आंतरजिल्हा बदल्यांबाबत सुधारित धोरण निश्चित करण्यात आले.

जिल्हा परिषद शिक्षकांकडून विशेष बाब बदलीबाबत जिल्हा परिषद कार्यालयाकडे बरेच विनंती अर्ज प्राप्त झाले. तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडूनदेखील जिल्हा परिषदेकडे शिफारशी प्राप्त झाल्या. त्यास अनुसरुन दिनांक २७/०२/२०१७ मध्ये काही अपरिहार्य कारणास्तव विशेष बाब बदलीची तरतुद नसल्यामुळे जिल्हा परिषद, गडचिरोली कार्यालयाकडून काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक १५/०५/२०१४ मधील प्रकरण ५(२) नुसार विशेष बाब म्हणून शिक्षकांच्या बदलीचे ३० प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयास पाठविले. दिनांक १५/०५/२०१४ नुसार विशेष बाब बदलीचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान केलेले असल्याने प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या ३० बदली प्रस्तावांपैकी २७ प्रस्तावास विभागीय आयुक्त कार्यालयाने मंजूरी दिलेली आहे.

विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी मंजूरी दिल्यानुसार शिक्षकांच्या बदलीबाबतचे आदेश निर्गमीत करण्यात आले असून ते शिक्षक पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झालेले आहेत.

---

## मंठा (जि.जालना) येथील उप जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१८) १४१३४ (२८-०६-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक १२८४४ ला दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) येथील उप जिल्हा रुग्णालयाचे मुख्य इमारत व अधिकारी / कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा शल्य चिकित्सक, जालना यांचे मार्फत उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांचे कार्यालयास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडून शासनास सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे काय तसेच, उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१), (२) व (३) मंठा (जि.जालना) येथील ३० खाटांवरून ५० खाटांचे श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालयाचे मुख्य इमारत बांधकामाचे व अधिकारी /कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रक हे दोन्ही प्रस्ताव १५ कोटींपेक्षा जास्त किंमतीचे असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचेमार्फत उक्त प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर ठेवण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सीपीएस रेडीयोलॉजिस्टना सोनोग्राफी करण्याचा अधिकार मिळण्याबाबत

**(१९) १४१५७ (२८-०६-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे आरोग्यसेवा विभागाचे अतिरिक्त संचालक यांनी “कॉलेज ऑफ फिजीशीअन सर्जन” येथून पीसीएनडीटी अंतर्गत नोंदणीकृत असलेले आणि सन २०१७ नंतर डीएमआरई पदवीधारक वैद्यकीय व्यावसायिक या नोंदणीसाठी पात्र ठरणार नसल्याने त्यांना सोनोग्राफी करण्याचे अधिकार नसल्याचे निर्देश दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्देशांमुळे सोनोग्राफी, सिटीस्कॅन व एमआरआय अशा कोणत्याही प्रकारची सेवा या डॉक्टरांना देता येणार नसल्याने त्यांचे भवितव्य अंधारमय बनले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रेडीयोलॉजिस्ट म्हणून करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२४-०८-२०२२) :** (१) कॉलेज ऑफ फिजीशिअन व सर्जन, मुंबई येथे डी.एम.आर.ई. या पदविकेसाठी सदर कोर्सची मान्यता शासनाने काढून घेतल्यानंतर प्रवेश घेतलेले पदविका धारक गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ अंतर्गत नोंदणी करण्यास पात्र नाहीत असे केंद्र शासनाने दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे यांनी दिनांक २२ एप्रिल, २०२२ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व समुचित प्राधिकारी यांना केंद्र शासनाच्या पत्रानुसार आपल्या कार्यक्षेत्रात योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविले होते.

(२) व (३) तत्कालिन मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी कॉलेज ऑफ फिजीशिअन व सर्जन, मुंबई येथून सन २०१७ नंतर डी.एम.आर.ई. पदविका घेतलेल्या पदविका धारकांसोबत बैठक झाली. सदर बैठकीवेळी केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाचे अवर सचिव यांचेशी मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांची दूरध्वनीद्वारे चर्चा केली. त्यावेळी केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या अवर सचिव यांनी केंद्र शासनाचे दिनांक १३/०४/२०२२ चे पत्र मागे घेण्याबाबत केंद्र शासनस्तरावर कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले. त्यानुसार या बैठकीतील चर्चेनुसार दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रास केंद्र शासनाकडुन पुढील सुधारित मार्गदर्शक सुचना प्राप्त होईपर्यंत अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे यांच्या दिनांक २८ एप्रिल, २०२२ च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(२०) १४३८४ (२२-०६-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालविकास विभागांतर्गत जिल्ह्यात तीन हजारपेक्षा अधिक अंगणवाड्या असून सदर अंगणवाड्यांमध्ये ३ हजार २५४ अंगणवाडी सेविका व २ हजार ६०० मदतनीस असे एकूण ५ हजार ८५४ कर्मचाऱ्यांचे तीन महिन्यांचे मानधन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील कुपोषणाचे प्रमाण रोखणे, लहान मुलांची बौद्धिक व शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी जिल्ह्यातील अंगणवाडीसेविका मुलांना प्राथमिक शिक्षण देत असणे इत्यादी महत्वाची कामे अंगणवाडी सेविका व मदतनीस करतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे वा त्यानुषंगाने रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांचे प्रलंबित तीन महिन्याचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे माहे जुलै, २०२२ पर्यंतचे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणाली व्दारे अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.